# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.03.2025** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान आजपासून दोन दिवसांच्या गुजरात, दीव, दमण दौऱ्यावर
2. सहकार क्षेत्राच्या विकासासाठी जागतिक स्तरावर भागीदारी वृद्धींगत करण्याची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक 2025 विधानसभेत मंजूर आणि
4. भारतीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार सुनील छेत्रीचं आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पुनरागमन

**गुजरात दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसीय गुजरात, दादरा नगर हवेली आणि दीव दमणच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान मोदी सुरत, नवसारी आणि दमणमधल्या सिल्व्हासा इथं विविध कार्यक्रमांना उपस्थित राहाणार आहेत. आज सकाळी दादरा, नगर हवेली आणि दमण इथं 2587 कोटी मूल्यांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. तसंच सिल्वासा इथं जाहीर सभेला संबोधित करतील. त्यानंतर सुरतमध्ये सुरत अन्न सुरक्षा आणि परिपूर्णता मोहिमेचा शुभारंभ करतील. सुरतमधील दोन लाख लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचा लाभ मिळणार आहे. तसंच उद्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नवसारीमध्ये होणाऱ्या लखपती दीदी संमेलनाला मोदी उपस्थिती लावणार आहेत. यावेळी 25 हजाराहून अधिक बचत गटांमधील अडीच लाख महिलांना साडेचारशे कोटी रुपयांहून अधिक मदत वितरित करतील.

**पंतप्रधान सहकार**

भारतीय सहकारी क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी जागतिक सहकारी संस्थांबरोबरची भागीदारी वृद्धींगत करण्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केली आहे. सहकार संस्थांद्वारे सेंद्रीय उत्पादनांना प्रोत्सह देण्याच्या गरजेवरही भर दिला. देशातल्या सहकार क्षेत्राच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी निर्यातीवर भर देण्यावर लक्ष केंद्रीत करावे तसेच माती परीक्षण पद्धतींचा विकास करावा अशाही सूचना दिल्या. शाळा, महाविद्यालये आणि व्यवस्थापन शिक्षण संस्थांमध्ये सहकाराविषयीचे अभ्यासक्रम सुरू करण्याचा तसेच भावी तरुण पिढीला प्रेरणा ठरू शकणाऱ्या सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याचा प्रस्तावही मांडला. या बैठकीला गृह आणि सहकार मंत्री अमित शहा तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**पंतप्रधान पुरस्कार**

कोविड महासाथीच्या काळात धोरणात्मक नेतृत्व आणि महत्त्वाच्या मदतीसाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बार्बाडोस या कॅरिबियन राष्ट्राच्या प्रतिष्ठित मानद ऑर्डर ऑफ फ्रीडम ऑफ बार्बाडोस या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. बार्बाडोसमध्ये ब्रिजटाऊन इथं झालेल्या समारंभात परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गारिटा यांनी पंतप्रधानांच्या वतीनं हा पुरस्कार स्वीकारला.

**विधिमंडळ**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक 2025 काल विधानसभेत एकमताने मंजूर झालं. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. या सुधारणेमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या पडीक जमिनी शेतकऱ्यांना परत मिळणार आहेत. राज्यातील 4849 एकर पडीक जमीन शेतकऱ्यांना मिळणार आहे. याचा लाभ छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना होणार आहे. कंपन्यांकडून होणारी गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी राज्यात आर्थिक गुप्तवार्ता विभाग सुरू करण्यात येईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी काल विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भैय्याजी जोशी यांनी मराठीच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याचा मुद्दा काल विधीमंडळाच्या दोन्ही गाजला. यावर मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही जोशी यांच्या मराठीबाबतच्या विधानावर तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान आपल्या विधानाचा विपर्यास केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैयाजी जोशी यांनी म्हटलं आहे.

**अर्थमंत्री**

पत मूल्यांकनाच्या नवीन आकृतीबंधांमुळे एमएसएमईच्या कर्ज प्रस्तावांची प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल,असं मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं. त्या काल विशाखापट्टणम इथं अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या समवेत डिजिटल फूटप्रिंट्सच्या स्कोअरिंगवर आधारित पत मूल्यांकनाच्या नवीन आकृतीबंधांचं उद्घाटन करताना बोलत होत्या. या नवीन आकृतीबंधामुळे कागदपत्र कमी लागतील तसंच कर्ज प्रस्तावांना डिजिटल पद्धतीनं तत्काळ तत्वतः मंजुरी मिळेल,असंही त्यांनी सांगितलं. दरम्यान भारतीय निर्यातीवरील शुल्काच्या समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार अमेरिकेशी चर्चा करत असल्याचंही अर्थमंत्र्यांनी सांगितलं. अर्थमंत्र्यांनी आंध्र प्रदेशातील काकीनाडा आणि राजमहेंद्रवरम इथं लघु उद्योग विकास बँक ऑफ इंडियाच्या दोन शाखांचं उद्घाटनही केलं.

**राहुल गांधी**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल मुंबईला भेट दिली. या भेटीत त्यांनी सुधीर राजभर यांच्या चामर स्टुडिओ या दुकाना भेट दिली आणि चर्मउद्योगातल्या कामगारांची भेट घेऊन, त्यांच्या समस्यां जाणून घेतल्या.

**अश्विनी ग्राफिक्स**

येत्या तीन ते चार वर्षांत भारत स्वतःचं ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट विकसित करेल असं प्रतिपादन इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं. सरकारनं दिलेल्या 40 टक्के अनुदानानंतर भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कॉम्प्युटेशन ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिटची किंमत जागतिक स्तरावर सर्वात कमी असून ती 67 रुपये प्रति तास एवढीच आहे असं वैष्णव यांनी सांगितलं. दिल्लीत कृत्रिम बुद्धिमत्तेविषयीच्या एआय कोश या पोर्टलचं तसंच इतर एआय आधारित उपक्रमाचं उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते काल झालं त्यावेळी ते बोलत होते. मंत्रिमंडळाने एक वर्षांपुर्वी भारत एआय मिशनला मान्यता दिली होती.

**नीतीन गडकरी**

प्रगतीशील समाजाच्या निर्मितीसाठी नागरिकांनी अस्पृश्यता, जातीभेद आणि असमानतेपासून स्वतःला मुक्त ठेवलं पाहिजे असं केंद्रीय मंत्री नीतिन गडकरी यांनी म्हटलं आहे. दिल्ली इथं लोकमाता अहिल्याबाई होळकर सन्मान संमारंभाला संबोधित करताना गडकरी बोलत होते. कोणालाही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानलं जाणार नाही अशा समानतेवर आधारित समाजनिर्मितीचे लक्ष्य ठेवण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी  आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी समाजाच्या कल्याणासाठी सरकार राबवत असलेल्या अनेक उपक्रमांवर प्रकाश टाकला.

**डोनाल्ड ट्रम्प**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिकोच्या अध्यक्षांशी चर्चा केल्यानंतर बहुतेक वस्तूंवरील 25 टक्के कर लागू करण्याचा निर्णय एक महिन्यासाठी पुढे ढकलला आहे. त्यांनी  काल  ही  घोषणा  केली. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात कॅनडा आणि मेक्सिकोशी केलेल्या व्यापार कराराचं पालन करणाऱ्या वस्तूंना ही सवलत लागू होईल. मात्र, अमेरिकेच्या निर्यातीवर शुल्क आकारणाऱ्या देशांवर अमेरिका येत्या दोन एप्रिल पासून आयात कर लागू करण्यावर  ठाम  असल्याचं ट्रम्प यांचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी  स्पष्ट  केलं.

**जनऔषधी**

सातवा जनऔषधी दिवस आज साजरा होत आहे. जनेरिक औषधांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि या योजनेविषयी जागरुकता निर्माण कऱण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. किफायतशीर किंमतीत दर्जेदार जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे नागरिकांना बाजार भावापेक्षा 50 ते 80 टक्के कमी किमतीत औषधे उपलब्ध होत आहेत.

**आदिवासी विनिमय**

आदिवासी युवा आदानप्रदान कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी काल दोनशे आदिवासी तरुणांशी संवाद साधला. छत्तीसगड आणि ओडिशाच्या आदिवासी दिल्लीच्या दौऱ्यावर आले आहेत.  डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली असलेल्या जिल्ह्यांमध्ये अनेक विकास कामं झाली असून, रस्ते आणि रेल्वे जाळे विकसित झाले आहे. आदिवासी समुदायांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि संस्कृती जपण्यात मोठे योगदान दिले असून, तरुणांनी 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

**सुनील छेत्री**

भारतीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार सुनील छेत्री, मालदीव आणि बांग्लादेश विरुद्ध होणाऱ्या फीफा आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारतीय संघाकडून खेळणार असल्याचं अखिल भारतीय फुटबॉल महासंघानं म्हटलं आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये कुवेतबरोबर झालेल्या सामन्यानंतर छेत्रीनं आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली होती. पण आता तो भारतीय संघात पुनरागमन करत आहे. येत्या 19 मार्चला शिलॉन्गमध्ये भारताचा सामना मालदीवबरोबर मैत्रीपूर्ण सामना होईल; त्यानंतर बांग्लादेशबरोबर साखळी सामनाही होणार आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**